# गौरी गणेश महाजन हीस लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल विषेश ''आदर्श योग शिक्षक'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

कोविड १९ च्या जागतिक महामारीच्या काळात सतत दोन वर्षे प्रत्यक्ष तसेच ऑडीओ,व्हीडीओ माध्यमातून आकाशवाणी व दुरदर्शन च्या माध्यमातून सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी व समाजातील सर्व घटकांत योगासनाच्या माध्यमातून प्रतिकार शक्तीचा अविश्कार घडवून अबाल वृध्दांचे , मानसिक,शारिरीक आरोग्य जपत ऑक्सीजन लेव्हल वाढवून अनेकांचे प्राण वाचविले, हे अतुलनिय महानकार्य केले ''करा योग राहा निरोग '' हा संदेश देऊन योगासन,सुर्यनमस्कार,प्राणायाम यांचे महत्व पटवुन रोगमुक्त भारत अभियानात हिरारीने भाग घेऊन विषेशतः महिला व बालकांमध्ये मानसिक, शारिरीक आरोग्य जपण्याचे कार्य करून अनेकांचे प्राण वाचविले व जिवदान दिले.

वयाच्या ४ थ्या वर्षापासून योगासन क्रिडा प्रकारात दैदित्यमान योगदान देत आपल्या कलागुणांमुळे देशविदेश पातळीवर विविध योगासन क्रिडा स्पर्धेत सहभागी होवून अनेक मानचिन्हे सुवर्णपदक , योगासन चॅम्पीयनशिप, ग्लोबल वर्ल्ड रेकॉर्ड , नोबल वर्ल्ड रेकॉर्ड प्राप्त करून देशाभिमान वाढविल्याब-ल तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केल्याब-ल सरदार वल्लभभाई पटेल बहुउ-ेशिय विकास संस्था, शिवसेना जळगांव जिल्हा, रोटरी क्लब सेंट्रल जळगांव यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०३/०९/२०२३ रोजी गौरी गणेश महाजन हिचा सरदार वल्लभभाई पटेल विषेश आदर्श योगशिक्षक पुरस्कार मा.महापौर सौ.जयश्रीताई महाजन, माजी महापौर व विद्यापिठ सदस्य श्री विष्णू भंगाळे, उद्योजक व प्राध्यापक श्री डी.डी.बच्छाव सर, जळगांवचे सुप्रसिध्द डॉ.अर्जुन भंगाळे, ग.स.सोसायटीचे संचालक श्री.राम पवार , गट शिक्षण अधिकारी श्री. खलील शेख सो.,रोटरी क्लबचे माननीय सदस्य यांच्या हस्ते शाल,श्रीफळ,मानपत्र व गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी जिल्ह्यातील सर्व आदर्श पुरस्कारर्थी शिक्षक,पालक,विद्यार्थी,नागरीक उपस्थित होते.

गौरी च्या या यशाब-ल शैक्षणिक,सामाजिक,राजकिय व क्रिडा क्षेत्रातून हार्दिक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.